आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

७ जुलै २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत-इंडोनेशिया संबंध दृढतर झाल्यानं आग्नेय आशिया आणि जागतिक शांतता आणि स्थैर्याला बळकटी येईल असं प्रधामनंत्र्यांचं प्रतिपादन

- नर्मदा नदीवर सरदार सरोवर धरण बांधल्यानंतर निर्माण झालेल्या सर्व समस्या दूर झाल्या असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही

- अयोध्येतल्या श्रीराम मंदिराच्या दानपेटीतल्या कथित भ्रष्टाचाराविरोधात काँग्रेसचं 'रघुपती राघव राजाराम सत्याग्रह' हे राज्यव्यापी आंदोलन सुरु

**आणि**

- नाशिक, अहिल्यानगरमध्ये जोरदार पाऊस, मुंबईत पावसाची विश्रांती

**<><><><><>**

भारत-इंडोनेशिया संबंध दृढतर झाल्यानं दोन्ही देशांबरोबरच आग्नेय आशिया आणि जागतिक शांततेला आणि स्थैर्याला बळकटी येईल असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. काही शतकांपासूनचे या देशांचे संबंध परस्पर विश्वासाचे आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करणारे राहिले असल्याचं त्यांनी सांगितलं. इंडोनेशिया दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी प्रधानमंत्री मोदी यांचं इंडोनेशियन संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत भाषण झालं. विकास, शांती, स्थैर्य आणि समृद्धी ही भारतानं जपलेली मूल्य असल्याचं सांगून त्यांनी दहशतवादाविरुद्ध एकजुटीनं कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली. संरक्षण, शिक्षण, सागरी व्यापाराची सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा विविध क्षेत्रात दोन्ही देशात आज महत्त्वाचे करार झाल्याचा उल्लेख त्यांनी केला. ...

**होल्ड- बाईट- प्रधानमंत्री( युपीआय)**

व्यक्तिगत पातळीवर दोन्ही देशांमधे समान सांस्कृतिक धागे असल्याचं ते म्हणाले. पायाभूत सुविधा, शिक्षण अशा विविध क्षेत्रात परस्पर सहकार्याला मोठा वाव असल्याचं त्यांनी सांगितलं. अवकाश आणि उपग्रह क्षेत्रात भारत इंडोनेशियाला सहकार्य करायला तयार आहे असं त्यांनी सांगितलं.

इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रोबोवो सुबियंतो यांच्याशी आज मोदी यांची द्विपक्षीय चर्चा झाली. इंडोनेशियातला सर्वोच्च नागरी सन्मान बिनतांग आदिपूर्णा आज मोदी यांना प्रदान करण्यात आला. मोदी यांना मिळालेला हा ३५वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार आहे.

<><><><><>

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मिसिंग लिंकमध्ये निर्माण झालेल्या समस्येची कारणं सरकार शोधत आहे. ही कारणं सभागृहात मांडली जातील असं निवेदन मंत्री शंभूराज देसाई यांनी विधान परिषदेत दिलं. हे सरकार कुणालाही पाठीशी घालणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. देहू आणि आळंदीहून निघणाऱ्या पालख्यांमधल्या वारकऱ्यांना पावसात सरकार काही मदत करणार का यासंदर्भात निवेदन करण्याचे निर्देश सभापती राम शिंदे यांनी सरकारला दिले.

मुंबई गोवा महामार्गावर इंदापूर आणि माणगाव बाह्य वळण वगळता इतर कामं ऑगस्ट २०२६ अखेर पूर्ण करण्याचं नियोजन आहे असं सरकारनं आज विधान परिषदेत लेखी उत्तरात सांगितलं.

कर्नाटकसारख्या राज्यात जात पडताळणी करणं गरजेचं नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सुधारणा करता येईल का याचा विचार करावा, त्यासाठी ॲडव्होकेट जनरलच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात सुधारित अर्ज दाखल करावा अशी मागणी सदस्य प्रसाद लाड यांनी केली. त्यावर कायदेशीर बाबी तपासून घेऊ असं आश्वासन मंत्री माधुरी मिसाळ यांनी सदनात दिलं.

महिला शेतकरी विधेयक कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज विधान परिषदेत मांडलं.

<><><><><>

राज्यात सध्या सुमारे चार ते साडे चार लाख बेकायदा बाईक टॅक्सी रस्त्यावर धावत असून आरटीओ वेळोवेळी त्यांच्यावर कारवाई करत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यात फक्त इलेक्ट्रिक बाईक्सना परवानगी देण्यात आली होती, पण पेट्रोल बाईक्स सर्रास रस्त्यावर उतरल्या, त्यामुळे त्यांच्यावर बंदी घालायचा निर्णय सरकारने घेतला. पण देशभर सगळीकडे एकाच ॲपद्वारे या कंपन्या काम करत असल्यामुळे ही बंदी मागे घ्यावी लागली, असं ते म्हणाले. येत्या १ ऑगस्टपासून अशा सर्वच प्रकारच्या वाहनांचा परवाना मिळवताना अधिवासाचं प्रमाणपत्र सक्तीचं केलं जाणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

बलात्कार आणि बालकांवरच्या अत्याचाराची प्रलंबित प्रकरणं हाताळण्यासाठी १३८ विशेष जलदगती न्यायालयं स्थापन करायला मान्यता दिली आहे, मात्र न्यायाधीशांच्या अभावी यापैकी फक्त ५८ न्यायालयं कार्यान्वित आहेत. या न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाकडे सतत पाठपुरावा सुरू आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. न्यायव्यवस्थेत कनिष्ठ स्तरावर अनेक पदं रिक्त असून यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याचा मुद्दा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी उपस्थित केला आणि यावर वेगानं काम करावं, अशी सूचना सरकारला केली. ते केलं जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

सरकारने आत्तापर्यंत सभागृहात दिलेली आश्वासनं आणि अधिक माहिती पटलावर ठेवण्याच्या परिस्थितीबाबतची श्वेतपत्रिका हे अधिवेशन संपेपर्यंत काढावी, असा आदेश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज दिले. १७ डिसेंबर २०१५ रोजीच्या

उत्तरित प्रश्नाची अधिक माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्र्यांनी सभागृहासमोर मांडली. त्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी आक्षेप घेतला. हा मुद्दा अतिशय गंभीर असल्याचं मत नार्वेकर यांनी नोंदवलं आणि अशा सर्व प्रलंबित बाबींचा अनुशेष पुढच्या अधिवेशनापर्यंत भरून काढावा, असंही त्यांनी सरकारला सांगितलं.

<><><><><>

नर्मदा नदीवर सरदार सरोवर धरण बांधल्यानंतर निर्माण झालेल्या सर्व समस्या दूर झाल्या आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्त्वाखाली नवी दिल्लीत ४ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक झाल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. यापूर्वी राज्याकडे २-३ हजार कोटी रुपयांच्या थकीत रकमेची मागणी केली जात होती. आता राज्याला केवळ २७ कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. तसंच राज्याला १० टीएमसी पाणी मिळणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

<><><><><>

अयोध्येतल्या श्रीराम मंदिराच्या दानपेटीतल्या कथित अपहार आणि भ्रष्टाचाराविरोधात काँग्रेसनं 'रघुपती राघव राजाराम सत्याग्रह' या राज्यव्यापी आंदोलनाची सुरुवात आज नाशिकच्या काळाराम मंदिरापासून केली. कार्यकर्त्यांनी 'रघुपती राघव राजाराम' हे भजन सामूहिकपणे गात आंदोलनाचा प्रारंभ केला. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी याप्रकरणी भाजपा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि राम मंदिर ट्रस्टच्या विश्वस्तांवर टीका केली. आंदोलनाचे मुख्य समन्वयक मोहन जोशी, धुळ्याच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव, कॉंग्रेस नेते ॲड. संदीप पाटील यावेळी उपस्थित होते.

लातूरमधे लातूर शहर आणि जिल्हा काँग्रेस समितीनं गंजगोलाई इथं लातूरचं ग्रामदैवत आई जगदंबेच्या महाआरतीनं या आंदोलनाची सुरुवात केली. त्यानंतर काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी 'रघुपती राघव राजाराम' हे भजन गात

कथित अपहाराचा निषेध नोंदवला. श्रीराम मंदिर देणगीतील कथित अपहार प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

**<><><><><>**

मुंबई आणि उपनगरात आज सकाळपासून वातावरण ढगाळ आहे, परंतु पावसानं उसंत घेतल्यानं काल विस्कळीत झालेलं जनजीवन पूर्वपदावर आलं. रस्ते आणि रेल्वे वाहतूक सुरळीत होत आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांच्या पाणलोट क्षेत्रात जलसाठ्याची पातळी वाढत आहे. गेल्या २४ तासात तलाव क्षेत्रात एक लाख ७३ हजार दशलक्ष लिटरची भर पडली. सातही तलावातला उपलब्ध जलसाठा २८ पूर्णांक ९२ शतांश टक्के झाला आहे. गेल्या सहा दिवसात शहर आणि उपनगरात सुमारे अकराशे वृक्ष उन्मळून पडल्याची माहिती पालिकेच्या सूत्रांनी दिली.

**<><><><><>**

राज्यात आज पावसानं काही ठिकाणी उसंत घेतली तर काही ठिकाणी जोरदार सरी कोसळल्या.

**नाशिक** आणि त्र्यंबकेश्वरवरचं ढगफुटीचं संकट टळलं असलं तरी आज जिल्ह्यात काही ठिकाणी अतिवृष्टी, तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे जिल्ह्यातल्या गंगापूर आणि इतर धरणांच्या, तसंच गोदावरी नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली. कसारा घाटात आज दरड कोसळल्यानं काही काळासाठी वाहतुकीवर परिणाम झाला.

**अहिल्यानगर** जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस होत असल्यामुळे प्रशासनानं या भागात पावसाळी पर्यटनाला बंदी घातली आहे. सांदनदरी, कोकणकडा, रतनगड, कळसुबाई शिखरासह विविध धबधबे आणि इतर

साहसी खेळ बंद केले आहेत. पेडगाव ते शेडगाव, आर्वी पुनर्वसन ते अजनुज या मार्गांसह श्रीगोंदा तालुक्यातले दोन प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद केले आहेत.

**रायगड** जिल्ह्यात गेल्या ६ दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरु आहे. हवामान खात्यानं जिल्ह्याला आज पावसाचा रेड अलर्ट दिला असल्याने जिल्ह्यातल्या सर्व शाळांना सुट्टी दिली आहे. पावसामुळे सतत दरडी कोसळत असल्यानं भोर-महाड रस्ता ३१ ऑगस्टपर्यंत तर आंबेनळी घाट ३१ जुलै पर्यत बंद ठेवण्याचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे. जिल्ह्यातल्या अंबा, सावित्री, पाताळगंगा, कुंडलिका , भोगावती, बाळगंगा, उल्हास या नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. हे पाणी गावात शिरल्यानं कोट्यवधी रुपयांचं नुकसान झालं आहे. खबरदारीचा उपाय म्हणून १४ गावातल्या लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे. रेवदंडा - साळाव पुलावरून २० टनावरच्या अवजड वाहतुकीला पोलिसांनी बंदी घातली आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्हयात पावसाचा जोर आज काहीसा कमी झाला. पण, वादळी वारे वाहत असल्यानं पडझड होऊन लाखो रुपयांचं नुकसान झालं आहे. जिल्ह्यातल्या ६७ गावांमधला वीज पुरवठा बाधित झाला असून महावितरणची अनेक पथकं दुरुस्तीची कामं करत आहेत.

**सांगली** जिल्ह्यातल्या प्रमुख नद्या आणि बंधाऱ्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. मात्र, सर्व ठिकाणी ती अद्याप धोक्याच्या पातळीखाली आहे.

**पालघर** जिल्ह्याच्या अनेक भागांत मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसामुळे डहाणूतल्या शेणसरी इथं एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. काही ठिकाणी जनावरं वाहून गेली आणि मालमत्तेचंही नुकसान झालं आहे. माहीम-केळवा धरण १०० टक्के भरलं असून, खबरदारीचा उपाय म्हणून अनेक रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे.

**बुलडाणा** जिल्ह्यात पावसानं उसंत दिल्यानं शेतीच्या कामाला वेग आला आहे. जिल्ह्यात शेतकऱ्यांनी सोयाबीन लागवडीला पसंती दिली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यातल्या २९९ बंधाऱ्यांपैकी ५७ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**ठाणे** जिल्ह्यातल्या भिवंडी तालुक्यात खडवली आणि जू गाव यांना जोडणारा पूल पाण्याखाली गेल्यानं त्यांचा इतर गावांशी संपर्क तुटला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी जोरदार पावसासह अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल.

**//<><><><><>//**